# सुचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये नाशिक शहराच्या प्रारुप सुधारित विकास योजनेचे प्रसिध्दीकरण**

क्रमांक :- जा.क्र. नावि/प्रासुवियो-नाशिक/कलम २६/प्रसिध्दी/७००, दि. २१.५.२०१५

ज्याअर्थी, नाशिक महानगरपालिकेने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेली), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखिलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली) चे कलम २३(१) व कलम ३८ मधील तरतुदीनुसार प्रारुप सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त प्रारुप विकास योजना" असे उल्लेखिलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र.८९९, दि.२७.१.२००९ अन्वये जाहीर करुन, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभाग पुरवणी, भाग-१ मध्ये दि.१५.७.२०१० रोजी प्रसिध्द केली आहे आणि अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार, सदर इरादा दि. ५.४.२०११ ला घोषीत झाल्याचे मानण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरुन आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून आदेश क्र. १०६/२०११, दि. १७.९.२०११ अन्वये नेमणूक केली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नाशिक यांनी नगर रचना अधिकारी या नात्याने, उक्त क्षेत्राची, उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन उक्त नियोजन प्राधिकरणाकडे, उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये, त्यावर जनतेकडून हरकती/सुचना मागविण्याकरिता प्रसिध्द करणेसाठी, दि. १३.८.२०१३ चे पत्रान्वये सुपर्द केली ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाच्या दि. ३.१०.२०१३ च्या उक्त प्रारुप विकास योजना रद्द करणेबाबतचे प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने, उक्त अधिनियमाच्या कलम २१ मधील तरतुदीनुसार, विभागीय सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी नियुक्त अधिकारी म्हणून उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन, उक्त अधिनियमाचे कलम २६ नुसार प्रसिध्द करण्याची पुढील कार्यवाही करणे आवश्यक ठरेल, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविलेले होते;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील आदेश क्र. नावि/प्रावियो नाशिक/कलम २१(४क)/अधिकारी नियुक्ती/२१४१, दि. २०.१२.२०१३ अन्वये नियोजन प्राधिकरणाच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी व अनुषंगीक कर्तव्ये पार पाडण्यासाठी तसेच या विकास योजना संदर्भाने कलम २६, २८ व ३० नुसार आवश्यक वैधानिक कार्यवाही पुर्ण करणेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम २१ (४ क) अन्वये सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांची "अधिकारी" म्हणुन नियुक्ती केली आहे (यापुढे उक्त "नियुक्त अधिकारी" म्हणुन उल्लेख करण्यात आला आहे,);

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजना, उक्त अधिनियमाच्या कलम २६ अन्वये प्रसिध्द करण्यासाठी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.१४.५.२०१५ चे आदेशान्वये दि. ३१.५.२०१५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे;

आणि, ज्याअर्थी उक्त नियुक्त अधिकारी यांनी उक्त प्रारुप विकास योजना तयार केली असून, नियोजन प्राधिकरण म्हणून उक्त प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) नुसार प्रसिध्द करण्यासाठी ठराव क्र. १, दि. २१.५.२०१५ पारीत केलेला आहे ;

त्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजना, उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये, नियुक्त अधिकारी, या नात्याने मी, निम्नस्वाक्षरीकार, नागरिकांकडून सुचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरीकांच्या अवलोकनार्थ, खाली नमुद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच www.nashikcorporation.in व www.dtp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

१) सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक
१ ला मजला, प्रशासकीय इमारत, आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड

२) आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
राजीव गांधी भवन, नाशिक

३) सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक
१ ला मजला, जुनी महानगरपालिका इमारत, नविन पंडीत कॉलनी, नाशिक

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन नागरिकांना या कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.

उक्त प्रारुप विकास योजनेतील तरतुदींसंबंधी नागरीकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ६० दिवसांच्या आंत उक्त नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक, १ ला मजला,प्रशासकीय इमारत, आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड यांचे कार्यालयाकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत उक्त नियुक्त अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकतींवरच केवळ विचार करण्यात येईल.

नाशिक
दि.२१.५.२०१५

(प्रकाश भुक्ते)
नियुक्त अधिकारी,
सुधारित विकास योजना, नाशिक
तथा
सहसंचालक, नगर रचना,
नाशिक विभाग, नाशिक